


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३२३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.०४ जुलै २०२५

## धनुष्यबाण कोणाचा, शिंदे की ठाकरे? १६ जुलैला 'सुप्रीम' सुनावणी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, मुंबई :** राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर येत आहे. शिवसेनेच्या चिन्हासाठी ठाकरे गटानं पुन्हा एकदा सुप्रीम कोर्टात धाव घेतली आहे. ठाकरे गटाकडून आज पुन्हा एकदा हे प्रकरण सुप्रीम कोर्टात मेन्शन करण्यात आलं आहे. गेल्या दोन वर्षांपासून प्रकरण प्रलंबित आहे. प्रकरण लवकर बोर्डावर घ्या अशी मागणी आता ठाकरे गटाकडून सुप्रीम कोर्टात करण्यात आली आहे. या प्रकरणावर आता येत्या १६ जुलै रोजी सुनावणी होणार आहे.




धनुष्यबाण कोणाचा यावर येत्या १६ जुलैला सुनावणी होणार आहे, ठाकरेंच्या वकिलांनी स्थानिक निवडणुकांचा हवाला देत चिन्हावर सुनावणीची मागणी केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील आठवड्यात घोषित होण्याची शक्यता आहे, असा युक्तिवाद ठाकरेंच्या वकिलांनी केला आहे. मात्र दुसरीकडे तातडीच्या सुनावणीला शिवसेना शिंदे गटाकडून विरोध करण्यात आला आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुका झाल्याचा मुद्दा शिवसेना शिंदे गटाकडून उपस्थित करण्यात आला आहे. यावर न्यायाधिशांनी येत्या १६ जुलैला सुनावणी ठेवण्याचे आदेश दिले आहेत. १७ फ्रेब्रुवारी २०२३ ला निवडणूक आयोगानं शिवसेना शिंदे गटाचा चिन्हावरील दावा मान्य केला होता. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती, तेव्हापासून हे प्रकरण प्रलंबित आहे. यावर आता १६ जुलैला सुनावणी होणार आहे.

एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेतून उठाव केला, या उठावानंतर शिवसेनेत उभी फूट पडली. पक्षाचे दोन गट पडले. शिवसेना शिंदे गट आणि शिवसेना ठाकरे गट. शिवसेनेतील अनेक आमदारांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडत शिंदेंना पाठिंबा दिला. त्यामुळे तत्कालीन महाविकास आघाडी सरकार अल्पमतात आलं, उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला, त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली.

दरम्यान त्यानंतर शिवसेना शिंदे गटाकडून पक्षाच्या धनुष्यबाण या चिन्हावर देखील दावा करण्यात आला होता. १७ फ्रेब्रुवारी २०२३ ला निवडणूक आयोगानं शिवसेना शिंदे गटाचा चिन्हावरील दावा मान्य केला होता. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती, तेव्हापासून हे प्रकरण प्रलंबित आहे.

## ज्ञानोबा माऊली आणि संत सोपानदेव बंधू भेटीने वैष्णवभक्तांचा मेळा सुखावला




**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०३, पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यातील प्रवेशद्वार असलेल्या टप्पा (ता. पंढरपूर) येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर व सोपानकाका यांच्या बंधुभेटीचा सोहळा वैष्णवांच्या अक्षरशः भक्तीरसात न्हाऊन निघाला. हा अनोखा सोहळा पाहताना वैष्णवांना अश्रू अनावर होत होते. माऊली माऊलीचा जयघोष आणि टाळ मृदुगांच्या तालाने अनेकांचा कंठ दाटून आला होता. एकूणच भेट सोहळा भावविवश झाला होता. या बंधुभेटीचा अविस्मरणीय क्षण आपल्याला पहावयास मिळाल्याचा आनंद उपस्थित भक्तांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता.पंढरपूर तालुक्यात ज्ञानोबा, तुकोबा पालखी सोहळ्यासह इतर संताचे पालखी सोहळे पंढरपूर तालुक्यात दाखल झाले आहेत. त्यामुळे मार्गावर वैष्णवांची गर्दी दिसून येत असली तरी त्यात शिस्त असल्याने पोलिसांना वाहतूक सुरळीत करण्यास मदत होत आहे.

विठ्ठल भेटीची आस लागलेल्या लांखो वैष्णवांचा आनंदमेळा चैतन्यमयी वातावरणात पंढरपूर तालुक्यात आज दाखल झाला. सकाळी ९ वाजलेपासून प्रमुख पालख्यांसह संत गुलाबबाबा महाराज, संत गोविंद महाराज उपळेकर, संत निळोबाराम महाराज, संत गवरशेठ लिंगामत वाणी महाराज, चांगावटेश्वर पालखी सोहळ्मांनी पंढरपूर तालुक्मात प्रवेश केला. आबालवृध्द वारकरी, खांद्यावर भगवी पताका, ज्ञानोबा-तुकोबांचा जयघोष, लाडक्या विठ्ठलाला अंभागातून दिलेली हाक, लयीत वाजणारे टाळ आणि विठुनामाचा गजर करित पालखी सोहळ्यातील एक एक दिंडी पुढे सरकत होती. एक एक दिंडी पुढे सरकत असताना बंधुभेटीचा सोहळा पाहण्यासाठी वैष्णव व परिसरातील ग्रामस्थांनी कडेला असलेल्या झाडाझुडपांच्या आश्रयाला गर्दी केली होती.

**पंढरीच्या सुखा तोचि अधिकारी।**
**जन्मोजन्मी वारी घडली तया ॥**

ही भावना मनी ठेवून कपाळी बुक्का आणि भगव्या पताका उंचावत लांखो वैष्णवांची मंदियाळी पंढरपूर तालुक्यात दाखल झाली. टाळमृदुगांचा गजर आणि विठ्ठल विठ्ठल, ज्ञानोबा-तुकारामच्या अखंड जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. भक्तीरसात तल्लीन झालेल्या महिला-पुरूष वारकरी आनंदाने फुगड्या खेळत होते. वारकऱ्यांचे खेळ मोबाईल कॅमेरात टिपण्यासाठी तरूणांची धडपड सुरू होती. अशी सर्वांची लगबग सुरू असताना अचानक माऊली आणि सोपानकाका पालखी सोहळा सर्वाच्या नजरेमध्ये दिसला अन् सर्व वैष्णवांचे बंधुभेटीसांक्ष कंठ दाटून आले. जसजसा दोन्ही पालखी सोहळा समीप येऊ लागला तसतसा संपूर्ण परिसर विठ्ठल नामाचा गजर अन् वैष्णवांच्या टाळ्याच्या कडकडाटाने भक्तीमय झाला. काहीजण देहभान, वय विसरून नाचणारे विठ्ठल नामाच्या गजरात दंग झाले होते. अखेर दुपारी ४ वाजता माऊली व सोपानकाका बंधुभेटीचा सोहळा वैष्णवांच्या भक्तीरसात न्हाऊन निघाला अन् उपस्थित असलेल्या लांखो वैष्णवांचे डोळे पाणावले. दोन्ही संस्थानांकडून परस्परांना नारळ प्रसाद दिला जातो. या बंधुभेटीनंतर प्रथम सोपानकाका व नंतर ज्ञानेश्वर पालखी सोहळा भंडिशेगांव येथील मुक्कामी ठिकाणी मार्गस्थ झाला. तद्अगोदर संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा दुपारी ३.३० वाजता पंढरपूर तालुका नगरीत दाखल झाला. तुकारामा तुकाराम नामाच्या जयघोषात व तोफांची सलामी देवून या पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यात आले. या स्वागतानंतर जगद्गुरू तुकार महाराज पालखी सोहळा पिराची कुरोली येथील पालखी तळ मुक्कामी मार्गस्थ झाला.

## रुग्णांना चांगली सेवा देण्यावर आरोग्य केंद्रांचा भर : मनपा आयुक्त विपीन पालीवाल

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, चंद्रपूर :** नागरिकांना चांगली आरोग्य सेवा देण्यासाठी मनपा रुग्णालयांच्या माध्यमातून प्रयत्न होत आहेत. त्यातही स्वच्छता, रुग्णाचे समाधान यावर अधिक भर दिला जात आहे. 'एनक्यूएएस' मानांकनासाठी आवश्यक त्या सर्व सेवा उपलब्ध करुन देण्याचे मनपाचे ध्येय असल्याचे आयुक्त विपीन पालीवाल यांनी सांगितले.

चंद्रपूर महानगरपालिकेच्या वतीने डॉक्टर्स डे निमित्त मनपाच्या सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी मनपा आरोग्य केंद्रांच्या सेवा या एनक्यूएएस म्हणजे राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानकानुसैर कशा करता येतील यावर चर्चा करण्यात आली. एनक्यूएएस ही मानके आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाने सार्वजनिक आरोग्य सुविधांमध्ये चांगली आरोग्य सेवा देण्यासाठी तयार




केली आहेत.

एनक्यूएएसचा मुख्य उद्देश सार्वजनिक आरोग्य सुविधांमध्ये आरोग्य सेवांची गुणवत्ता सुधारणे हा आहे. एनक्यूएएसमध्ये सेवा तरतूद, स्वच्छता, रुग्णांचे अधिकार, इनपुट, रुग्णांचे समाधान, रुग्णांना दिली जाणारी सेवा, सहायक सेवा, क्लिनिकल काळजी, संसर्ग नियंत्रण आणि गुणवत्ता व्यवस्थापन यासारख्या विविध क्षेत्रांसाठी मानके निश्चित केलेली आहेत. आरोग्य सुविधा या मानकांनुसार काम करीत आहे की नाही हे तपासण्यासाठी त्यांचे मुल्याकन केले जाते. जर त्यांनी चांगले काम केले, तर त्यांना एनक्यूएएस प्रमाणपत्र दिले जाते. शहरी प्राथमिक आरोग्य केंद्राला एनक्यूएएस प्रमाणपत्र मिळाल्यास, त्यांना शासनाकडून अधिक निधी मिळतो. एनक्यूएएसच्या निकषांमुळे आरोग्य सेवांची गुणवत्ता सुधारते. रुग्णांना चांगली आरोग्य सेवा मिळते. आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा होतात. आरोग्य कर्मचाऱ्यांमध्ये कामाचा उत्साह वाढतो. त्यामुळे यापुढे मनपाची ७ प्राथमिक आरोग्य केंद्रे व २१ आरोग्यवर्धिनी केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांद्वारे राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानकानुसार सुविधा व सेवा देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. याप्रसंगी उपायुक्त संदिप चिद्रवार, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नयना उत्तरवार, डॉ. अश्विनी भारत, डॉ. जयश्री वाडे, व वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## थोडक्यात

### कार्यालयीन वेळेत कर्मचारी खेळताय जुगार !



**अक्षराज : विनोद गिरी**

**दि.०३, डोंबीवली (ठाणे) :** कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या १०/ई प्रभाग मधील काही कर्मचारी कार्यालयीन वेळेत दावडी गाव, रीजन्सी येथील कार्यालय परिसरात पैज लावत रोज जुगार खेळत असतात अशी माहिती भेटल्यानंतर सदर ठिकाणी जाऊन बघितले असता माहितीमध्ये सत्यता आढळून आली.

या वेळी सदर ठिकाणी जीपीएस कॅमेऱ्याच्या सहाय्याने व्हिडिओ काढून सदर व्हिडिओ प्रभाग सहा. उपायुक्त १०/ई साहेबांना पाठवली आहे. त्यावर सदर सर्व कर्मचाऱ्यांना नोटीस बजावली आहे, पण या जुगार खेळणाऱ्या कर्मचाऱ्यांपैकी काही कर्मचाऱ्यांची बदली होऊन बऱ्याच कालावधी उलटला आहे. परंतु राजकीय वरदहस्त असल्यामुळे सदर कर्मचारी बदली झालेल्या ठिकाणी हजर होत नाही आणि तेच कर्मचारी इतर कर्मचाऱ्यांना घेऊन इथे जुगार खेळत बसलेले असतात, प्रभागामध्ये कार्य करण्यासाठी कर्मचारी अपुरे आहेत अशी माहिती दिली जाते. परंतु जर कर्मचारी अपुरे असतील तर हे कर्मचारी बसून कार्यालईन वेळेत जुगार कसे काय खेळत आहेत? असा प्रश्न याठिकाणी उपस्थित होतो. ज्या कर्मचाऱ्यांची बदली झाली आहे आणि बदली झालेल्या ठिकाणी हजर होत नाही अशा कर्मचाऱ्यांना कृपया तात्काळ सेवेतून निलंबित करण्याचे आदेश देऊन अशा बेजबाबदार कर्मचारी वर्गांवर व यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकारी, यांच्यावर सुद्धा शासकीय नियमानुसार कारवाई करण्यात यावी जेणेकरून अशा घटना इतर ठिकाणी घडणार नाहीत.

### दहावीच्या विद्यार्थ्याने संपवलं जीवन...
### खिशात सापडलेल्या नोटमध्ये शाळेतल्या मास्तरांचे नाव

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, बुलडाणा :** बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील वसाडी बुद्रुक येथे राज्याला हादरून घडणारी घटना समोर आली आहे. मुलं किती संवेदशील झाली आहे हे यावरून दिसून येते. वर्गात विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर न दिल्यामुळे शिक्षकाने शारीरिक शिक्षा केल्याने अपमानित झालेल्या दहावीतील विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना एक जुलै दुपारी वसाडी बुद्रुक येथे घडली. याप्रकरणी पिंपळगाव राजा पोलिसांनी संबंधित शिक्षकाला ताब्यात घेतले आहे. बुलडाणामधील मृतक विद्यार्थी विनायक महादेव राऊत (वय वर्ष १५) राहणार वसाडी बुद्रुक हा जय बजरंग विद्यालयात दहावी मध्ये शिक्षण घेत होता. वर्गात विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर न दिल्यामुळे वर्गशिक्षक गोपाल मारुती सूर्यवंशी राहणार खामगाव यांनी त्याला उभे राहून उठाबशा करण्याची शिक्षा दिली विनायकने पाय दुखत असल्याचे सांगून नकार दिल्यावर शिक्षकाने त्याला कपडे काढण्यास सांगितले अशी खळबळ जनक माहिती समोर आली आहे. झालेल्या या अपमानामुळे मानसिक धक्का बसलेल्या विनायकने शेतातील घरात अँगलला दोरी बांधून फास घेऊन आपले जीवन संपवले. या घटनेने संपूर्ण जिल्ह्याचे राज्यात एकच खळबळ उडाली. किती टोकाला जाऊन विनायक ने हा निर्णय घेतला असेल काय त्याच्या मनाच्या भावना असतील हा विचार न केलेलाच बरा. ज्या कवळ्या मनात शिक्षण घेण्याचं व एक उमेदीने जगण्याची जिद्द असते त्याच वयामध्ये विनायकने हे टोकाचे पाऊल उचलल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनेनंतर गावकऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. पिंपळगाव राजा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी मुकेश गुजर यांनी तातडीने घटनास्थळी पोचून पंचनामा केला.

### महाकवी कालिदास दिनानिमित्त विशेष कार्यक्रम




**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.०३, नवी मुंबई :** पाऊस माझा तुझा कविता सादरीकरणाचा कार्यक्रम योग विद्यानिकेतन वाशी येथे संपन्न झाला. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून कवयित्री लेखिका रेश्मा कारखानीस उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष पद साहित्यिक पत्रकार दुर्गेशजी सोनार यांनी भूषविले. डॉ. नंदकिशोर जोशी, डॉ.अरुंधती जोशी यांच्या मार्गदर्शनातून हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला. सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुंदर सुरुवात झाली. नवी मुंबई साहित्य परिषदेच्या कार्यवाहक डॉ. अरुंधती जोशी मॅडम यांनी ओमकार योगाचे व्यायामाचे महत्त्व माहिती सोप्या शब्दात सांगितले. नवी मुंबई साहित्य परिषदेचे उपक्रम कार्यक्रम उद्दिष्ट ऋतुजा गवस यांनी त्यांच्या प्रास्ताविकातून सांगितले. श्रीहरी पवळे यांनी पाऊस माझा तुझा संकल्पनेचा प्रवास थोडक्यात आपल्या शैलीत सांगितला. मान्यवरांचा परिचय संतोष जाधव यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्पना देशमुख यांनी केले. दिलीप जांभळे ह्यांनी महाकवी कालिदासांची माहिती सांगितली. शब्दसंवाद अंकुर पर्यावरण अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पाऊस माझा तुझा कविता सादरीकरणासाठी जवळ जवळ ५० /६० कविता आल्या होत्या. त्यापैकी १५ जणांना कविता सादरीकरणाची संधी दिली व इतर सर्व कविता ईबुक अंकात घेणार आहेत. रेश्मा कारखानीस ह्यांनी बालकविता, पाऊस निसर्ग लावणी अतिशय सुंदर रित्या सादर केली. कविता लेखन कसे करावे, मनापासून कविता लिहिली गेली पाहिजे. आतून उत्स्फूर्त अशी ती प्रसवली पाहिजे साध्या सोप्या भाषेत यांनी साहित्य श्रोत्यांशी संवाद साधला. त्याचप्रमाणे दुर्गेशजी सोनार यांनीही कवितेचे विविध प्रकार सहज आपल्या सुंदर अशा शैलीतून प्रेक्षकांसमोर मांडले. त्यांचे तानसेन होण्यापेक्षा कानसेन होणे महत्त्वाचं आहे. कवितांचे प्रकार, त्याची माहिती काही विशेष अशा कविता पंढरीची वारी कविता त्यांनी सादर केली. फक्त मुक्तछंद लिहीत असतानाही त्यातीलही छंद जोपासला गेला पाहिजे हे विशेष करून त्यांनी नोंदवले व आनंदी राहा एक छान आरोग्यमय सल्लाही त्यांनी दिला. १५ कवींनी पाऊस माझा तुझा एकापेक्षा एक अशा सुंदर कविता सादर केल्या व सर्वजण वर्षासरीत चिंब भिजून गेले.मान्यवरांच्या हस्ते सर्व कवींना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

## संपादकीय

### ऑनलाइन फसवणुकीचा नवा मार्ग

सध्याचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट आज जीवनावश्यक गरज बनली आहे. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण इंटरनेटचा वापर करतात. इंटरनेट चे स्वरूप जसे विस्तारित गेले तसे ऑनलाइन गुन्हेगारीही विस्तारित गेली.

ऑनलाइन गुन्हे रोखण्यासाठी पोलिसांची सायबर शाखा सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे असे असतानाही ऑनलाइन गुन्हे करणारे नवनवीन मार्ग शोधून सर्वसामान्यांची आर्थिक फसवणूक करत असतात. या फसवणुकीला केवळ सर्वसामान्य नागरिकच नाही तर नोकरदार, व्यावसायिक, डॉक्टर, वकील, इंजिनियर या सारखे प्रतिष्ठित नागरिक ही बळी पडतात. या सायबर गुन्हेगारांनी आता फसवणुकीचा मार्ग शोधून काढला आहे. तो आहे सेक्सटॉर्शन. अलीकडच्या काळात ऑनलाइन लैंगिक छळाचे प्रमाण वाढले आहे त्यातूनच हा शब्द निर्माण झाला आहे. अक्स्टॉर्शन म्हणजे खंडणी तसाच लैंगिक खंडणी म्हणजे सेक्सटॉर्शन.

सोशल मीडियाच्या फेसबुक अकाउंटचा यासाठी वापर केला जातो. सोशल मीडियाच्या फेसबुक अकाउंटवरुन तुम्हाला एका अनोळखी मुलीची फ्रेंड रिक्वेस्ट येते. ती फ्रेंड रिक्वेस्ट माहिती न घेता स्वीकारली जाते. नंतर मेसेंजरच्या माध्यमतातून चॅटिंग केली जाते. त्यानंतर एकमेकांचे व्हाट्सएप नंबर घेऊन व्हाट्सएपवर चॅटिंग होते. चॅटिंग बरोबरच व्हिडीओ कॉल, व्हाट्सएप कॉल करण्यास सुरुवात होते. समोरची व्यक्ती अंगप्रदर्शन करून अश्लील हावभाव करते. समोरच्या व्यक्तीला मोहात अडकवले जाते. त्याला प्रोत्साहन देऊन त्याच्याकडून विवस्त्र अश्लील बाबी करून घेतल्या जातात. विशेष म्हणजे या सर्वांचे व्हिडीओ ऑन स्क्रीन रेकॉर्ड केले जाते.

त्यानंतर काही दिवसांच्या फरकाने तुम्हाला मेसेज, फोन कॉल करून पैशांची मागणी केली जाते. पैसे न दिल्यास तुमचा अश्लील व्हिडीओ व्हायरल करून बदनाम करण्याची धमकी दिली जाते. अशा प्रकारे लैंगिक खंडणी सेक्सटॉर्शनची मागणी केली जाते. यात प्रामुख्याने कॉलेजमधील विद्यार्थी व समाजातील प्रतिष्ठित नागरिकांना टार्गेट केले जाते. यात फसणारे बदनामीला घाबरून या सायबर गुन्हेगारांना हवी ती रक्कम देतात. बऱ्याचदा रक्कम देऊनही पुन्हा मागणी केली जाते. त्यामुळे फसवले गेलेले मानसिक तणावात येतात त्यातून ते आत्महत्येचा मार्गही स्वीकारतात. या प्रकाराला बळी पडून काही जणांनी आत्महत्या केल्याच्या घटनाही घडल्या आहेत. सेक्सटॉर्शन हा पैसे कमावण्याचा नवा मार्ग सायबर गुन्हेगारांनी शोधून काढला आहे.

या सायबर गुन्हेगारांना पकडणे सायबर पोलिसांसाठी मोठे आव्हान बनले आहे कारण हे गुन्हेगार राज्याबाहेर किंवा देशाबाहेरचेही असू शकतात. या सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकू नये यासाठी सोशल मीडियाचा वापर करताना सावधगिरी बाळगायला हवी. कोणाचीही अनोळखी फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नये. आपली फ्रेंड लिस्ट आणि फॉलोअर्स वाढवण्याचा अट्टाहास आपले आर्थिक व मानसिक नुकसान करू शकतो. आजची तरुणाई सोशल मीडियाची मोठी फॅन बनली आहे. इंटरनेट, मोबाईल ही तरुणांची जीवनावश्यक गरज बनली आहे. मात्र याचा वापर समाजहिताच्या गोष्टी जोपासण्यासाठी झाला तरच उत्तम नाहीतर तुमची एक चूक तुमच्या जिवावरही बेतू शकते. म्हणूनच प्रत्येकाने सावधगिरी बाळगून सोशल मीडियाचा वापर करावा.

# महाराष्ट्र पूर्वीसारखा कणखर राहिलाय का?




**प्रास्ताविक :**

**महाराष्ट्र – अस्मितेचा गड की दुर्लक्षित सीमारेषा?**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य संकल्पातून जन्मलेला, सहकार चळवळीने प्रगत झालेला, औद्योगिकीकरणात देशाचं नेतृत्व करणारा महाराष्ट्र आज एका वेगळ्याच संकटासमोर उभा आहे.

२०१४ नंतर केंद्र आणि राज्य दोन्ही ठिकाणी भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यानंतर महाराष्ट्राच्या विकासाच्या संकल्पनाच बदलल्या गेल्या का, यावर आता खुलेपणाने चर्चा करणे आवश्यक ठरत आहे.

**१.** उद्योगांचे स्थलांतर – 'मेक इन इंडिया' की 'शिफ्ट टू गुजरात'?

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातून बाहेर गेलेल्या बहुचर्चित प्रकल्पांची यादी पाहिली, तर:

वेदांता-फॉक्सकॉन सेमीकंडक्टर प्रकल्प: अंदाजे ₹१.५४ लाख कोटींचा हा प्रकल्प २०२२ मध्ये महाराष्ट्रातून गुजरातला वळवण्यात आला. राज्याचे माजी उद्योग मंत्री सुभाष देसाई यांनी यावर राजकीय हस्तक्षेपामुळे महाराष्ट्राचा तोटा झाला असे स्पष्टपणे सांगितले.

टाटा-एअरबस विमान निर्मिती प्रकल्प: पुण्यातील नागपूरला प्रस्तावित असलेला हा संरक्षण मंत्रालयाचा भाग असलेला प्रकल्पही गुजरातला गेला.

हायड्रोजन आधारित इंधन सेल निर्मिती प्रकल्प (Ballard Power): याही प्रकल्पाला महाराष्ट्रातून स्थलांतरित करण्यात आले.

**स्रोत :** Indian Express, Business Standard, Scroll.in, २०२२-२०२३

या सर्व घटनांमध्ये एक गोष्ट समान दिसते - केंद्र सरकारने महाराष्ट्राच्या तुलनेत गुजरातला प्राधान्य दिलं.

**प्रश्न :** महाराष्ट्रात संपूर्ण अधोरेखित पायाभूत सुविधा, मनुष्यबळ आणि लॉजिस्टिक असूनही हे उद्योग इतरत्र का गेले?

**२.** निवडणुकांतील हस्तक्षेप आणि बनावट मतदारांचे संकट

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील मतदार यादीत फक्त ५ महिन्यांत ४०.८१ लाख नव्या मतदारांची वाढ झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

अनेक भागांत फेक आयडी प्रूफ, एकाच पत्त्यावर अनेक नोंदी, एकाच नावाचे अनेक युनिट्स अशी उदाहरणे समोर आली.

काही मतदारांचे नागरिकत्व, पत्ते, वय आणि बायोमेट्रिक माहितीच नव्हती.

**संदर्भ :** इंडियन एक्सप्रेस २०२४, Election Watch Reports, ADR India

या प्रकारामुळे लोकशाही प्रक्रियेची पारदर्शकता हरवत आहे.

मतांचा असा वापर म्हणजेच लोकशाही प्रक्रियेचा गैरवापर.

**३.** मराठी भाषेचा अपमान – जाणीवपूर्वक उपेक्षा

मराठी ही राज्यभाषा असूनही खालील पद्धतीने तिची गळचेपी सुरू आहे.

रेल्वे स्थानकांवरील घोषणांमधून मराठी गायब

केंद्र सरकारच्या अनेक संकेतस्थळांवर मराठीचा उल्लेख नाही

रेल्वे, पोस्ट ऑफिस, बँका यामध्ये मराठी भाषिक कर्मचाऱ्यांची संख्या झपाट्याने घसरते आहे.

**संदर्भ :** महाराष्ट्र राजभाषा संचालनालय, भाषिक हक्क समिती अहवाल २०२३

यामुळे स्थानिक लोकांमध्ये अपमानाची भावना तयार होते, आणि हा सामाजिक असंतोषाचा गंभीर स्रोत आहे.

**४.** स्थलांतरित राजकीय प्रभाव – स्थानिकांना डावललं जातंय का?

मुंबई, पुणे, ठाणे या शहरी भागांमध्ये इतर राज्यांतील नागरिक मोठ्या प्रमाणात स्थायिक झाले आहेत. यात कोणताही द्वेष नाही, पण...

स्थानिक मराठी तरुणांना नोकरीत प्राधान्य नाही

आरक्षणाच्या मर्यादा ओलांडून बाहेरील उमेदवारांची भरती

निवडणुकीत प्राधान्य 'संख्याबळा'ला, स्थानिक ओळख हरवत चालली

**संदर्भ :** Urban Migration data (Niti Aayog 2023), CMIE employment reports

**५.** सांस्कृतिक आणि राजकीय अधःपतन – विचारधारा विरुद्ध टीआरपी

आज अनेक चॅनेल्सवर, मंचांवर छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार जाणीवपूर्वक बाजूला ठेवले जात आहेत.

सामाजिक न्याय, सहकार, बहुजन समावेश यापेक्षा धर्माधारित ध्रुवीकरण हा अजेंडा प्राधान्याने पुढे आणला जातो.

राज्य सरकारचे निर्णयही केंद्राच्या इशाऱ्याशिवाय होत नसल्याचे स्पष्ट दिसते.

**६.** मराठी तरुणांचे भविष्य – शिक्षण असूनही संधीच नाही

इंजिनिअरिंग, आयटी, डॉक्टरेट करणाऱ्या तरुणांनाही बाहेरच्या कंपन्यांत कॉन्ट्रॅक्ट बेसवर नोकरी

स्थानिक स्किल हब, उद्योग धोरणे प्रभावी नाहीत

सरकारी नोकऱ्यांमध्ये स्थानिकांना डावलण्याचे अनेक पुरावे

**संदर्भ :** CMIE Youth Employment Report 2024, Skill India Maharashtra dashboard

**७.** प्रसारमाध्यमे – जनतेला सत्य मिळतंय का?

अनेक मराठी वाहिन्या सत्तेच्या बाजूने काम करत आहेत का?

भाजपसंबंधित मुद्द्यांवर मौन, विरोधकांवर टीका, जनतेच्या समस्या विसरल्या जातात.

निवडणुकीत सर्वात महत्त्वाचं माध्यम – 'मत' – चुकीच्या माहितीवर आधारित दिलं जातं.

**८.** निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचा अभाव – फक्त एक प्रश्न नाही, तर धोक्याची घंटा

निवडणूक आयोगाने अनेक वेळा स्पष्ट केलं की मतदार यादी पारदर्शक आहे, परंतु प्रत्यक्षात

वाढलेले मतदार आकडे

CCTV फुटेज न जाहीर होणं...

digital मतदार यादी डिनाय करणं

हे सगळं एक संघटित निवडणूक हस्तक्षेप असल्याचं भासवतं.

**संदर्भ :** Election Commission Clarification Letter (June 2024), ADR India, Scroll.in

**निष्कर्ष :** महाराष्ट्र – परत एकदा उठून उभं राहण्याची वेळ आहे

महाराष्ट्र म्हणजे केवळ एक राज्य नव्हे, तर तो एक विचार आहे.

तो विचार – प्रामाणिकपणा, बाणेदारपणा, परिश्रम आणि सामाजिक समता यावर उभा आहे.

आज या विचारावरच घाला घालण्याचे प्रयत्न होत आहेत.

म्हणूनच वेळ आली आहे विचार करण्याची –

**– आपण अजूनही स्वाभिमानी आहोत का?**

**– की राजकीय गणितांमध्ये हरवत चाललो आहोत?**

**टीप :** या लेखातील सर्व निरीक्षणं, विश्लेषण आणि मते वैयक्तिक असून, लेखक स्वतः संपूर्ण जबाबदारी घेतो.

**लेखक : विशाल सतीश पवार (धुळे)**

## चाहूल..

निवडणूका दाराशी
लागली जरा चाहूल
जाहीरहोती तारखा
वाजे कधीही बिगूल

चलाआता जनतेची
करा सुरु दिशाभूल
झाका खरी अंतर्मने
सजवा दिखावू झूल

प्रत्येकाने आपापली
शिलगावली बा चूल
रूलिंग पार्टी व्हायचे
आता बदले सर्वरूल

कसा फुटला पान्हा
जाणते ते छोटे मूल
वरती भिन्न डामडौल
ते बुरशीआलेले मूळ

गोंजारावे मतदारांना
गुज गोष्टी रे गुलगूल
करेपोषक वातावरण
पक्षाकरिता अनुकूल

वाद ग्रस्त बोल टाळ
वाचाळवीर प्रतिकूल
मुखा मध्ये ठेवा बर्फ
थंडाथंडा रे कूलकूल

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**
www.kavyakusum.com

अक्षराज
अचूक वेध अचूक बातमी

# राज्यात कुपोषित बालकांची आकडेवारी चिंताजनक !

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०३, मुंबई :** मुंबई : कधीकाळी कुपोषित बालकांचा जिल्हा म्हणून अमरावती जिल्ह्यातील मेळघाट हा प्रदेश ओळखला जात होता. मात्र, नुकत्याच आलेल्या आकडेवारीनुसार कुपोषित बालकांच्या संख्येत महानगरांमध्येच वाढ झाल्याचं चित्र आहे. राज्यात कुपोषित बालकांची आकडेवारी चिंताजनक असल्याचे एका सर्वेक्षणातून समोर आलं आहे. तब्बल १ लाख ८२ हजार ४४३ बालकं कुपोषित असल्याची सरकारची आकडेवारी असून सर्वाधिक कुपोषित बालक मुंबई उपनगरात असल्याचे धक्कादायक वास्तव देखील या आकडेवारीतून समोर आलं आहे.राज्यामध्ये मध्यम कुपोषित बालकांची संख्या १ लाख ५१ हजार ६४३ असून तीव्र कुपोषित बालकांची संख्या ३०, ८०० एवढी आहे. पुण्यातही कुपोषित बालकांची संख्या चिंताजनक असल्याचं चित्र आहे.



दरम्यान ग्रामीण भागापेक्षा शहरी भागामध्ये कुपोषणाच्या आकडेवारीत वाढ झाली असून मुंबई उपनगरमध्ये १६ हजार ३४४ कुपोषित बालके आहेत. त्यात, मध्यम कुपोषित बालकांची संख्या १३,४५७ तर तीव्र कुपोषित बालकांची संख्या २८८७ एवढी आहे. राज्यामध्ये मध्यम कुपोषित बालकांची संख्या १ लाख ५१ हजार ६४३ असून तीव्र कुपोषित बालकांची संख्या ३०, ८०० एवढी आहे. मुंबई उपनगराच्या पाठोपाठ नाशिक जिल्ह्यामध्ये कुपोषणाची संख्या वाढली. नाशिक मध्ये ९ हजार ८५२ कुपोषित बालकांची संख्या असून यात मध्यम कुपोषित बालकांची संख्या ८, ९४४ तर तीव्र कुपोषित बालकांची संख्या १८५२ एवढी आहे.

**पुण्यातील मध्यम कुपोषित बालकांची संख्या ७४१०**

ठाणे जिल्ह्यात मध्यम कुपोषित बालकांची संख्या ७३६६ आणि तीव्र कुपोषित बालकांची संख्या ८४४ एवढी आहे. मुंबईच्या तुलनेत पुण्यातील कुपोषित बालकांची पुण्यातील संख्या कमी आहे. पुण्यात मध्यम कुपोषित बालके ७४१० तर तीव्र कुपोषित बालके १६६६ एवढी आहेत.

**सरकारच्या योजनांवर होणारा खर्च विचार करण्यासारखा...**

धुळे जिल्हा मध्यम कुपोषित बालके ६३७७ आणि तीव्र कुपोषित बालके १७४१ आहेत. छत्रपती संभाजी नगर जिल्हा मध्यम कुपोषित बालके ६४८७ तर तीव्र कुपोषित बालके १४३९ आहेत. नागपूर मध्यम कुपोषित बालके ६७१५ तर तीव्र कुपोषित बालके १३७३ एवढी आहेत. कुपोषण कमी करण्यासाठी सरकारने सुरू केलेल्या योजना आणि होणारा खर्च यावरती मोठं प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचंही आकडेवारीतून समोर येत आहे.

# गुप्त माहिती, हुशारी आणि सापळा – मोबाइल चोरांची टोळी जेरबंद

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, येरवडा (पुणे) :** पुणे शहरात दिवसेंदिवस वाढणाऱ्या मोबाइल चोरीच्या घटनांना अटकाव घालत, गुन्हे शाखा युनिट-४ ने एक अत्यंत कौतुकास्पद आणि अचूक कारवाई केली आहे. या कारवाईत दोन सराईत मोबाइल चोरांना जेरबंद करण्यात आले असून, त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेले मोबाईल फोन्स, एक दुचाकी आणि इतर मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**अटक आरोपींची नावे :** १. सदाम इसाफ पठाण (वय २८, रा. आंबेडकर चौक, येरवडा), २. रोहित किरण पवार (रा. येरवडा) आरोपी हे पुणे परिसरात दुचाकीवरून फिरत नागरिकांचे मोबाईल हिसकावून




पळ काढण्याचे प्रकार करत होते. त्यांच्या विरोधात यापूर्वीदेखील अनेक गुन्हे दाखल आहेत. विशेष म्हणजे, यावेळी पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनंतर पोलीस हवालदार देवीदास वांढरे व पोलीस अमलदार अमजद शेख (गुन्हे शाखा युनिट-४) यांनी शादलबाबा डेक्कन कॉलेज परिसरात हुशारीने सापळा रचला.या सापळ्यादरम्यान दोन्ही आरोपींना रंगेहाथ अटक करण्यात आली. **त्यांच्याकडून जप्त करण्यात आलेला मुद्देमाल :** दुचाकी (क्र. चक१२-तक-४०६६), दोन मोबाईल फोन, एक डिझायनर शर्ट, चोरीसाठी वापरण्यात आलेली इतर साधने एकूण जप्त मुद्देमालाची किंमत सुमारे ₹८०,००० इतकी आहे. या यशस्वी कारवाईनंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय वाघमारे यांनी युनिट-४ च्या दोन्ही पोलीस कर्मचाऱ्यांचे विशेष कौतुक केले. पोलिसांची तत्परता, चौकस डोळा आणि हुशारी हीच शहराच्या सुरक्षिततेची खरी हमी आहे, असे प्रतिपादन यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केली.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात


## जिल्ह्यात १८ जुलैपासून कृत्रिम साहित्याचे वाटप; शिबीरांचे आयोजन

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.०३, बीड :** दिव्यांग बांधवांना सहानुभूती नव्हे, तर भक्कम साथ देऊया!, या उदात्त दृष्टीकोनातून खा.बजरंग सोनवणे यांच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासन व एलिम्को मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने संपुर्ण बीड लोकसभा मतदार संघामध्ये दिव्यांग व्यक्तींना व ज्येष्ठ नागरिकांना मोफत कृत्रिम साहित्य/साधने वाटप करण्यात येणार आहे. दिनांक १८ जुलै २०२५ पासून हे शिबीर पंचायत समिती स्तरावर राबविण्यात येत आहे.

बीड लोकसभा मतदारसंघातील तालुक्यांमध्ये भव्य पूर्व तपासणी व नोंदणी शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. या शिबिरांचा मुख्य उद्देश दिव्यांग व्यक्तींना मोफत कृत्रिम अवयव, विविध सहाय्यभूत साधने उपलब्ध करून देणे, तसेच ज्येष्ठ नागरिकांना 'राष्ट्रीय वयोश्री योजने' अंतर्गत मोफत सहाय्यक उपकरणे प्रदान करणे हा आहे. एलिम्को, मुंबई या केंद्र शासनाच्या अधिकृत संस्थेच्या माध्यमातून १८ जुलै ते ३० जुलै २०२५ या कालावधीत बीड लोकसभा मतदार संघात ही विशेष शिबिरे आयोजित केली जातील. या शिबिरांमध्ये पात्र लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी, नोंदणी प्रक्रिया आणि आवश्यकतेनुसार तात्काळ मोफत कृत्रिम अवयवांचे वाटप केले जाईल. हा उपक्रम दिव्यांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी एक मोठा दिलासा ठरणार आहे. या माध्यमातून त्यांना आत्मनिर्भर होण्यास आणि दैनंदिन जीवन सुलभ करण्यास मदत मिळेल.

## थकीत मानधनामुळे अंगणवाडी मदतनीस आर्थिक संकटात


दि. 23-06-2025
प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद धाराशिव
विषय :- थकीत असलेले मानधन मिळणे बाबत.
अर्जदार :- सौ. मस्के पंचशिला किरणकुमार
रा. डिकसळ ता.कळंब जि.धाराशिव

**अक्षराज : राजेश पुरी**

**दि.०३, कळंब (धाराशिव) :** डिकसळ (ता. कळंब) येथील अंगणवाडी मदतनीस पंचशिला किरणकुमार मस्के यांनी जानेवारी २०२३ ते ऑक्टोबर २०२३ या कालावधीतील थकीत मानधन मिळण्याच्या मागणीसाठी जिल्हा परिषद धाराशिव येथे दिनांक २३ जून २०२५ रोजी लेखी अर्ज सादर केला आहे. १० महिन्यांपासून थकीत असलेले मानधन अद्यापही त्यांच्या खात्यात जमा झालेले नाही. मस्के या एकात्मिक बाल विकास योजने अंतर्गत अंगणवाडी मदतनीस म्हणून कार्यरत असून त्यांनी प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका व तालुका कार्यालयात वेळोवेळी लेखी व तोंडी विनंत्या करून ही अद्याप त्यांच्या अर्जाची दखल घेतलेली नाही. बँक स्टेटमेंट व पुरावे दिले असतानाही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्याने त्या गंभीर आर्थिक संकटात सापडल्या आहेत.

कुंटुंबातील अपघातग्रस्त पती व शिक्षण घेत असलेली मुले या जबाबदाऱ्यांमुळे मस्के यांच्यावर संपूर्ण कुंटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी आली आहे. त्या सध्या अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीत जीवन जगत आहेत. मस्के यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे सादर केलेल्या अर्जाची तातडीने सहानुभूतीपूर्वक दखल घेऊन संबंधित कालावधीतील मानधन अदा करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. ह्या अर्जाच्या प्रती मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.धाराशिव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.धाराशिव, गटविकास अधिकारी, पंचायत समिती कळंब, खासदार ओम राजे निंबाळकर, आमदार कैलास घाडगे पाटील, सामान्य प्रशासन विभाग, जि.प.धाराशिव यांना दिल्या आहेत.

## उपमुख्यमंत्री शिंदे यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे मुख दर्शन



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.०४, पंढरपूर :** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे मुख दर्शन घेतले. आषाढी यात्रा सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी भाविकांची दर्शन रांगेत मोठ्या प्रमाणात गर्दी असून भाविकांना सुलभ व जलद दर्शन व्हावे. त्यांना कोणताही अडथळा येऊ नये. यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुखदर्शन घेतले. यावेळी त्यांच्या समवेत जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी ही श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे मुख दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर जतन व संवर्धनाचे काम सुरू असून झालेल्या कामांची पाहणी केली तसेच मंदिर समितीचे अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी मंदिर जतन व संवर्धन कामाबाबतची माहिती यावेळी दिली. तसेच यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन व आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचा सत्कारही मंदिर समितीच्या वतीने सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी केला. यावेळी आमदार समाधान आवताडे, राजू खरे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज शोत्री उपस्थित होते.

## मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०३, खंडाळा (सातारा) :** श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालय, फलटणच्या सातव्या सत्रातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव कार्यक्रम (ठक्थए) अंतर्गत गुरुवार, दिनांक ०३ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वा.पाडळी गावात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, सामान्य आजारांबाबत जनजागृती करणे व आरोग्याविषयी सवयींमध्ये सुधारणा घडवून आणणे हा होता. शिबिरात गावातील नागरिकांची तपासणी करून रक्तदाब, रक्तातील साखर (शुगर), हिमोग्लोबिन, ताप, वजन, दृष्टी तपासणी आदी सेवा पुरविण्यात आल्या. विशेष म्हणजे महिलांच्या आरोग्यविषयक समस्या, वृद्ध व्यक्तींचे आरोग्य आणि लहान मुलांच्या वाढीचे परीक्षण यावरही लक्ष केंद्रीत करण्यात आले.तपासणीनंतर उपस्थित डॉक्टर व विद्यार्थ्यांनी नागरिकांना योग्य आहार, नियमित व्यायाम व वैद्यकीय सल्ल्यांचे महत्त्व पटवून दिले. या उपक्रमासाठी श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.निंबाळकर, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.यु.डी.चव्हाण, कार्यक्रम अधिकारी डॉ.जे.व्ही.लेंभे, प्रा.डॉ.ए.के.अभंगराव व कार्यक्रम समन्वयक प्रा.ए.डी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. ग्रामस्थांनी या उपक्रमाचे उत्स्फूर्त स्वागत केले व पुढील काळातही असेच शिबिर होण्याची अपेक्षा व्यक्त केली.

## येत्या १५ ऑगष्ट पासून प्रवाशांना एसटीचे लोकेशन देखील मोबाईलवर मिळणार



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०३, मुंबई :** आपली एसटी कुठपर्यंत पोहोचली हे प्रवाशांना आता ॲपच्या माध्यमातून समजणार आहे. राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) एक ॲप तयार करण्यात आलं असून लालपरीचे लोकेशन समजू शकणार आहे. एसटी तिकीटावर असलेल्या क्रमांकाच्या माध्यमातून बस स्टॅन्डवर येण्याची अचूक वेळ समजणार आहे. १५ ऑगस्टला हे ॲप प्रवाशांच्या सेवेत येणार आहे. सध्या एसटीच्या १४ हजार ५०० बसमध्ये जीपीएस लोकेशन यंत्र बसवण्यात येणार आहे.

राज्यभरात सध्या ५० हजार मार्गावर एसटीच्या सुमारे सव्वालाख फेऱ्या होतात. लाखो प्रवासी एसटीतून प्रवास करतात. गावखेड्यात एसटी जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाते. ज्या भागांमध्ये रेल्वे पोहोचत नाही तिथे एसटी पोहोचते. अनेकजण लांब पल्ल्यांचा प्रवास असेल एसटीचे आगाऊ आरक्षण करुन तिकीट बुक करतात. पण अनेकदा ट्रॅफिकमध्ये अडकून पडल्यामुळे एसटीला उशिरा आली तर प्रवाशांना ताटकळत उभं राहावं लागतं. पण आता प्रवाशांची ही समस्या कायमची मिटणार आहे.

मधल्या थांब्यावर एसटी नेमकी कधी येणार याची माहिती मिळत नसल्याने तासनतास ताटकळत राहावे लागते. यासाठी महामंडळाने तयार केलेल्या ॲपच्या मदतीने बसचे थांबे आणि त्यांच्या निवडलेल्या स्थानकामध्ये ती येण्याचा अपेक्षित वेळ समजणार आहे. यासाठी बसमध्ये जीपीएस यंत्रणा बसवण्याचे काम सुरू आहे. सध्या १२ हजार बसमध्ये ही यंत्रणा बसवण्यात आली आहे. त्यामुळे उर्वरित सर्व बसमध्ये जीपीएस बसवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## पाटण शहरात पाण्याची बोंबाबोंब; पावसाळ्यात पाण्यासाठी नागरिकांची भटकंती

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०३, पाटण (सातारा) :** देसाई गल्ली येथे मेन पाईप लाईनची पाईप चॉकप झाली आहे. त्यामुळे चौधरी गल्लीतल्या पाण्याच्या टाकीमध्ये पाणीसाठा झाला नाही.

४ ते ५ दिवस झाले देसाई गल्लीतल्या मेन पाईपलाईन चे काम चालू असल्याने चौधरी गल्लीतील पाण्याची टाकी पाण्याने भरली नाही. चौधरी गल्लीच्या पाण्याच्या टाकीतून ४ विभागाला पाण्याचा पुरवठा केला जातो तो झाला नाही. हे चार विभाग पाटणची मुख्य बाजारपेठ झेंडा चौक लायब्ररी चौक जुना बस स्थानक नवीन बस स्थानक या विभागाला जोडला आहे.



त्यामुळे गेले ४ ते ५ दिवस पाणी न आल्याने या विभागात पाटण शहरात नगरपंचायतीच्या नावाने बोंबाबोंब चालू आहे.

ऐण पावसाळ्यात पाण्याची आणीबाणी चालू आहे. पाटण शहरातील महिलावर्ग पाटण नगरपंचायतीवर संताप व्यक्त करत आहे.

सध्या पाटणमध्ये पावसाचे दिवस असल्याने पाणी आणायचे कुठून ही मोठी समस्या महिलांच्या समोर आहे. पाईपलाईन चॉकप झाली अजून दुरुस्त झालेली नाही कधी पाणी पुरवठा सुरळीत होईल हे ही सांगू शकत नाही. ज्या विभागांमध्ये पाणी येत नाही. त्या विभागामध्ये नगरपंचायतीने टँकरद्वारे पाणीपुरवठा करायला पाहिजे होता. पण नगरपंचायतीने तशी व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

पाटण शहरातील नागरिकांना पावसाच्या वळचणीच्या पाण्यावर आपली गरज भागवावी लागत आहे. नगरपंचायतीला कधी जाग येणार असा संतप्त प्रश्न नागरिकांना पडला आहे.

गेले ४ ते ५ दिवसापासून पाण्याविना नागरिकांचे हाल मोठ्या प्रमाणात होत आहेत. यामध्ये पाटणची मुख्य बाजारपेठ लायब्ररी चौक, जुना बस स्थानक, झेंडा चौक, नवीन बस स्थानक, चौधरी गल्ली टाकीवरून पाणीपुरवठा केला जातो. त्या विभागामध्ये पाणीपुरवठा होत नसल्याने पाटण शहरात पाण्याची आणीबाणी चालू आहे, तर पाटण नगरपंचायतीचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. ज्या विभागामध्ये पाणी येत नाही. त्या विभागामध्ये नगरपंचायतीने टँकरने पाणीपुरवठा करावा अशी पाटण शहरातील नागरिकांची मागणी होत आहे

## १०० वर्ष जुनं 'जिमी बॉय' कॅफे झालं बंद

### मुंबईकर अस्सल कीमा पाव, बेरी पुलाव आणि मावा केकला मुकले

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०३, मुंबई :** मुंबईतील फोर्ट परिसरातील हॉर्निमन सर्कलजवळ असलेले 'जिमी बॉय' हे आयकॉनिक पारशी कॅफे, आपल्या १०० व्या वर्धापनदिनाच्या काही महिने आधी बंद झाले आहे. या कॅफेच्या इमारतीच्या जीर्ण अवस्थेमुळे हा निर्णय घेण्यात आला, असे म्हटले जात आहे.१९२५ मध्ये जिमी बॉयची स्थापना 'कॅफे इंडिया' या नावाने जमशेद आणि बोमन इराणी या बंधूंनी केली होती.

१९९९ मध्ये जमशेद यांचा मुलगा अस्पी इराणी यांनी आपल्या वडिलांना श्रद्धांजली म्हणून याचे नाव 'जिमी बॉय' असे बदलले. तीन पिढ्यांपासून हे कॅफे पारशी खाद्यसंस्कृती जपत आहे. कीमा पाव, बन मस्का, इराणी चहा, ऑम्लेट पाव, मावा केक आणि मावा समोसा




यासारख्या पारंपरिक पारशी पदार्थांसाठी हे कॅफे प्रसिद्ध आहे.

यावर्षी सप्टेंबरमध्ये या कॅफेचा शतकमहोत्सव साजरा होणार होता, पण त्यापूर्वीच ते बंद झाले. दि. २० जून रोजी या चारमजली इमारतीत मोठ्या भेगा दिसल्याने बृहन्मुंबई महानगरपालिका (बीएमसी) च्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाला कळवले. दुसऱ्या दिवशी सकाळी तपासणीनंतर इमारत राहण्यायोग्य नसल्याचे निष्पन्न झाले आणि तात्काळ रिकामी करण्याचे आदेश देण्यात आले.

माहिमतुरा कन्सल्टंट्सच्या मागील ऑडिटमध्ये इमारतीच्या भारवाहक भिंती आणि स्लॅब्समध्ये गंभीर बिघाड असल्याचे नमूद केले होते. परंतु कोणतीही दुरुस्ती झाली नव्हती, ज्यामुळे इमारत 'अत्यंत जीर्ण' ठरली.बीएमसी ने २१ जून रोजी मुंबई महानगरपालिका कायदा १८८८ च्या कलम ३५४ अंतर्गत मालक आणि भाडेकरूंना इमारत त्वरित रिकामी करण्याचे व पाडकाम करण्याचे आदेश दिले. यामुळे जिमी बॉयला आपले फोर्टमधील दुकान बंद करावे लागले.

तसेच, कॅफेचे संचालक शेरझाद इराणी यांनी स्पष्ट केले की, हे बंद तात्पुरते आहे. माहिम येथील टेकअवे आउटलेट आणि नेव्ही नगरमधील कॅफे ऑलिव्ह ग्रीन येथे जिमी बॉयचे पदार्थ उपलब्ध आहेत.

ऑनलाइन डिलिव्हरीद्वारे ही ते पारशी खाद्यपदार्थ पुरवत आहेत. या बंदमुळे मुंबईकरांच्या आणि पर्यटकांच्या मनात हळहळ व्यक्त होत आहे. जिमी बॉयच्या चाहत्यांना आशा आहे की, कायदेशीर प्रक्रिया आणि दुरुस्तीनंतर हे कॅफे पुन्हा सुरू होईल आणि आपल्या शतकाच्या परंपरेला पुढे चालू ठेवेल.

## ठाणे रेल्वे स्थानकालगतच्या एस.टी आगारात खड्ड्यांचे साम्राज्य

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०३, ठाणे :** ठाणे रेल्वेस्टेशन जवळील एसटी आगारात खड्याचं साम्राज्य झालं असून प्रशासनाच याकडे पूर्ण दुर्लक्ष होत असल्याची बातमी समोर आली आहे. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाकडून ठाणे जिल्हा रेल्वे व वाहतूक प्रवासी सामाजिक सेवा संस्थेने प्रशासनाला या बाबत निवेदन दिले आहे. ठाणे हे मध्य रेल्वेचे अतिशय जुने रेल्वेस्टेशन तर आहेच, पण या स्टेशन लगतच असणाऱ्या एसटी आगाराकडे प्रशासनाच दुर्लक्ष असून रोजच्या हजारो प्रवासी अनेक समस्यांना रोज सामोरं जात आहेत.

ठाणे जिल्हा आणी इतर प्रवाशांसाठी अत्यंत महत्वाच असलेल हे आगार अक्षरशः समस्येने ग्रासलं आहे. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या ठाणे जिल्हा प्रवासी आणी वाहतूक संस्थेकडे अनेक नागरिकांच्या तक्रारी आल्या, नागरिकांनी वेळोवेळी प्रशासनाकडे दाद मागून ही समस्यांचे निराकरण न झाल्याने नागरिकांनी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडे धाव घेतली आहे.शिवसेना नेते माजी खासदार राजन विचारे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेच्या पदाधिकारींनी एसटी आगाराची पहाणी केली असता एसटी आगार अक्षरशः खड्यात गेल्याच चित्र दिसून आले आहे. तसेच या खड्डयांमूळे प्रवासी एसटीतून उतरताना बराच वेळा पडले आहेत. खड्यातून एसटी जाताना प्रवाशांच्या चिखल उडत असल्याच निदर्शनास आले आहे.

एवढच नाहीतर आगाराची परिस्थिती जीर्ण झाली असून कधीही आपत्ती येवू शकते अशी परिस्थिती आहे. एसटीने प्रवास करण्याची संख्या मोठ्या प्रमाणात असून देखील आगाराच्या दुरावस्थेकडे प्रशासन डोळे झाक कसं काय करु शकतं असा सवाल देखील उपस्थित केला जात आहे.



सदर घटना लक्षात घेवून शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रवक्ते आणि ठाणे जिल्हा रेल्वे व वाहतूक प्रवासी संघटनेचे अध्यक्ष तुषार रसाळ, नौपाडा विभागप्रमुख तथा ठाणे जिल्हा रेल्वे व वाहतूक प्रवासी संघटनेचे कार्याध्यक्ष रमेश शिके, महागिरीचे विभाग प्रमुख संजय भोई, उपविभागप्रमुख नौपाडा सदानंद गोवर्धने, नोपाडा विभाग सचिव जगदीश निकम, आदित्य भानूशाली माथाडी कामगार सेना, कार्याध्यक्ष राजू शिंदे, उल्हास शिवनेकर, जगन्नाथ तावडे, शाखाप्रमुख संतोष निकम, शाखाप्रमुख जितेंद्र भुवड, शाखाप्रमुख राजू म्हात्रे, उपविभागप्रमुख तसेच समस्त शिवसैनिकांनी मिळून प्रशासनाला गुरूवार, दिनांक ०३ जुलै २०२५ रोजी ला भेटून समस्यांचे निवेदन दिलं आहे. तसंच लवकरात लवकर या समस्या सोडवण्याची मागणी केली. ह्या समस्या वेळेत सोडवल्या नाहीत तर शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे तसेच ठाणे जिल्हा प्रवासी आणी वाहतूक संस्था ठाणेकरां सोबत जनआंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# दिव्यांगाची वारी, विठ्ठलाच्या दारी, पांडुरंगा भेटी निघाले अंध वारकरी

**अक्षराज : राजेश पुरी**

**दि.०२ कळंब (धाराशिव) :** पांडुरंगाच्या ओढीने महाराष्ट्रातून अनेक वारकरी वाटेवर चालत असतात. याच वारीत सहभागी होण्यासाठी ३० अंध तरुण वारकरी स्वतंत्र दिंडी काढून विठुरायाच्या दर्शनासाठी यवतमाळ ते पंढरपूर अंध वारकऱ्यांची पायी निघालेली आहे. संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मूकबधिर विद्यालय कळंब जिल्हा धाराशिव येथे मुक्कामी होती.



यावेळी सर्व अंध वारकऱ्यांना स्वादिष्ट असे बेसन भाकरी, वरण भात, लोणचे, शेंगदाणे चटणी, जिलेबी असे भोजन देऊन निवास व्यवस्था करण्यात आली. सकाळी चहा-बिस्कीट घेऊन पुढे अंधांची वारी मार्गस्थ होत असतांना, सेवा समर्पण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रशांत बनगीनवार व अंध मुलांचे स्वागत तुळजाई प्रतिष्ठानचे सचिव शहाजी चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

सेवा समर्पण प्रतिष्ठान चॅरिटेबल ट्रस्ट यवतमाळचे अध्यक्ष प्रशांत बनगीनवार यांच्या नियोजनाखाली संत सूरदास महाराज दिव्यांग वारी २०२५ वर्षे २ रे ही वारी १५ जून रोजी यवतमाळ येथून सुरुवात झाली. या वारीमध्ये ३० अंध मुले असून त्यांच्यासोबत ६ व्यक्ती केअरटेकर म्हणून असतात.

हे अंध विद्यार्थी स्वतः पालखी घेऊन पायी पंढरपूर पर्यंत ५०० किलोमीटर चालत जातात. यावेळी प्रशांत बनगीरवार यांच्यासोबत चर्चा करत असताना ते म्हणाले की, तुम्ही एकटेच वारीला जातात, आम्हाला पण तुमच्यासोबत येऊ द्या. अशी अंध मुलांनी त्यांनी विनंती केली. २०२४ पासून महाराष्ट्रातील पहिली अंध मुलांची दिव्यांग वारी सुरू झाली.

या दिव्यांग वारीसाठी प्रवास करत असताना सर्व लोकांचे खूप सहकार्य लाभते.त्यानंतर ते पुढे म्हणाले की,यवतमाळ जिल्ह्याचा सर्वे केला असता, १६०० अंध मुले घरी आहेत. त्यामुळे सर्व अंध मुलांना स्वालंबी बनविण्यासाठी चा हा प्रकल्प आहे.

या मुलांना व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते. त्यामध्ये उदबत्ती, धूप,मेणबत्ती, द्रोण, पत्रावळी अशा अनेक प्रकारच्या वस्तू बनविला जातात. सध्या ४० अंध मुले प्रकल्पामध्ये प्रशिक्षण घेत आहेत असे सांगितले.

तसेच त्यांचाच दुसरा प्रकल्प म्हणजे बेघर मनोरुग्ण निवारा केंद्र यवतमाळ येथे चालू आहे आणि वृद्धाश्रमात १७० वृद्ध वास्तव्यास आहेत. या प्रकल्पाचे अध्यक्ष सुरेश भाऊ राठी हे काम पाहतात.या सर्व प्रकल्पासाठी शासनाकडून कसलेही अनुदान घेतले जात नसून लोकसहभागातून व स्वखर्चातून केले जातात.

आज पर्यंत या प्रकल्पामधून अनेक अंध व्यक्ती स्वालंबी झाले आहेत. काहीजण कॉल सेंटरवर काम करतात व काहीजण वस्तू बनवण्याचा स्वतःचा व्यवसाय चालवतात व काहीजण संगीत मध्ये ट्रेंड झाल्यानंतर इतर टीम मध्ये व्यवसाय करतात किंवा स्वतः व्यवसाय करतात. आज पर्यंत एकूण १४ अंध मुलांचे पुनर्वसन करून स्वतःच्या पायावर उभे केले आहेत.तसेच या प्रकल्पात मॉर्डन आर्केस्ट्रा चालू आहे.

त्यामध्ये अंध व्यक्तींना कोणत्याही गायकाचे गीत गायला सांगितल्यास ते म्हणतात लेटेस्ट संगीत व इतर साहित्य वाजवतात. या सर्व अंध वारकऱ्यांचे यवतमाळ ते पंढरपूर पर्यंत प्रशांत बनगिरवार व त्यांच्या प्राची बनगिरवार नेहमी सावली सारख्या सोबत असतात व त्यांची आपल्या मुलांप्रमाणे काळजी घेतात. वारी चालत असताना त्यांना सर्व समाजातील लोकांचे खूप सहकार्य मिळते असे प्रशांत बनगिरवार यांनी सांगितले.

# थोडक्यात

## मुल येथे कृषी दिन साजरा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. ०३ मुल, (चंद्रपूर) :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व हरितक्रांतीचे प्रणेते कै. वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्य पंचायत समिती, मुल व तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मुल यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समिती सभागृहात कृषी दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून पंचायत समिती, मुलचे गट विकास अधिकारी अरुण चनफने तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन मुलचे तालुका कृषी अधिकारी सुनिल कारडवार हे उपस्थित होते. यावेळी मागील वर्षी खरीप भात पीक स्पर्धेत तालुका स्तरावर प्रथम क्रमांक पटकावणारे शेतकरी पियुष येनगंटीवार बोरचांदली, तुलाराम नन्नावरे भवराळा तसेच प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रीया उदयोग उभारणीसाठी संदेश डोंगरे चक घोसरी, फळबाग लागवडीसाठी दिपक गुरनुले मुल तर सामुहिक शेततळयात मस्यपालन, कुक्कुटपालन, शेळीपालन इत्यादी कृषी पुरक व्यवसायासाठी पंकज गेडाम टेकाडी इत्यादी शेतकऱ्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.




पंचायत समिती मुलच्या कृषी अधिकारी कु. मनिषा राजनहिरे यांनी आपल्या प्रास्ताविक भाषनातुन कै. वसंतराव नाईक यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. तसेच पंचायत समिती मार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनाबाबत मार्गदर्शन केले. तालुका कृषि अधिकारी सुनिल कारडवार यांनी कृषी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना महाडिबीटी, फळबाग लागवड, ॲग्रीस्ट्रॅक योजनेबाबत मार्गदर्शन केले. तसेच चालु खरीप हंगामात पिक व्यवस्थापनाचे सुधारीत तंत्रज्ञानाचा वापर करुन व नैसर्गिक शेतीच्या घटकांचा वापर करून पिक लागवड खर्चात बचत करुन निव्वळ नफ्यात वाढ करावी असे आवाहन केले. तर सतिश वनकर सहाय्यक कार्यक्रम अधिकारी नरेगा यांनी शेतकऱ्यांना बांधावर, नदी- नाल्याकाठी व पडिक जमिनीवर बांबु लागवडी बाबत मार्गदर्शन केले. उपकृषी अधिकारी श्रीकांत कारडे यांनी पिक स्पर्धा, पि.एम.किसान सन्मान निधी योजना, गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजना बाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लाभलेले पंचायत समिती मुलचे गट विकास अधिकारी अरुण चनफने यांनी शेतकऱ्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन आपल्या शेतीत प्रगती साधावी, असे आवाहन केले. यावेळी तालुक्यातील ७० शेतकरी कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन कु. शिल्पा मंत्रिवार उपकृषी अधिकारी बेंबाळ यांनी केले. तर आभार प्रदर्शन कु. स्वाती खिल्लारे सहाय्यक कृषि अधिकारी, पिपरी दिक्षीत यांनी केले.

# विंचूर येथील पुलाची झाली दुरावस्था; ठीकठिकाणी पडले खड्डे



> आम्हाला या पुलावरून दिवसातून दहा वेळा ये जा करावी लागते. छोट्या छोट्या गोष्टीसाठी आम्हाला विंचूर गावात यावे लागते. पुलाची तर अशी परिस्थिती झालेली आहे कधी पडेल सांगता येणार नाही. तरी शासनास विनंती आहे की, लवकरात लवकर पुलाचे काम करावे अन्यथा आम्ही पुलावर आंदोलन करू.
>
> **प्रभाकर गलांडे (शेतकरी, विंचूर)**
>
> ---
>
> आम्ही भुजबळ साहेबांना निवेदन दिलेले आहे. निवेदन देऊन देखील कोणीही या पुलाकडे येण्यास तयार नाही. पूल कधी पडेल हे सांगता येणार नाही. अशी परिस्थिती पुलाची झालेली आहे.आमचे शाळेतील मुले या पुलावरून शाळेत जात असतात एखाद्या वेळेस काही घटना झाल्यास याला जबाबदार कोण ? वारंवार आम्ही निवेदन दिले आहे. तरी देखील प्रशासन या गोष्टीकडे लक्ष देत नाहीये. तरी प्रशासनास विनंती आहे की, लवकरात लवकर पुलाचे काम करावे ही विनंती.
>
> **नरसिंग दरेकर (शेतकरी समाजसेवक, विंचूर)**

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०३, विंचूर (नाशिक) :** विंचूर शहरातील थेटाळाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पुल पावसाने अचानक खचल्याने वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झाला आहे. पुलाच्या मध्यभागी खड्डा पडल्याने हा पूल तातडीने वाहतुकीस दुरुस्त अथवा नव्याने करून देण्यात यावा. अशी मागणी त्या रस्त्यालगतच्या शेतकरी, दुग्ध उत्पादक आणि शाळेत जाणारे विद्यार्थी यांची शासनाला कळकळीची विनंती केली आहे.

विंचूर थेटाळा रोड वरील लोणगंगा नदीवरील पूलाची अत्यंत बिकट अवस्था झाली आहे. मागील वर्षी पावसाळ्यात सदर पुलावरून पुराचे पाणी वाहिल्याने तो खचला आहे. तसेच मोठे- मोठे खड्डे पडलेले आहे.

त्यामुळे लोणगंगा नदीवरील पुलावरून शालेय विद्यार्थी, दूध उत्पादक शेतकरी, शेतीसाठी लागणारे मजूर व शेतमालाची वाहतूक मोठ्या प्रमाणात या पुलावरून होत असते. पावसाळ्यात जास्त पाऊस झाल्याने, पुराचे पाणी पुलावरून वाहत आहे. तसेच विठ्ठलवाडी, कृष्णवाडी, थेटाळे येथून शाळेत येणारे विद्यार्थी तसेच शेतकरी यांची वाहतूक टप्प होते. त्यामुळे शालेय विद्यार्थी तसेच दूध उत्पादक शेतकरी यांचे खूप मोठे नुकसान होत आहे. तसेच लोणगंगा नदीवरील पूल कधी कोसळेल हे सांगता येत नाही. पुल जर तुटला बराच लोकांचा, शाळेत जाणारे विद्यार्थी व व्यावसायिक यांचा संपर्क तुटेल. आणि या पुलावर काही जीवितहानी झाली तर याला जबाबदार कोण असा नागरिकांनी प्रश्न उपस्थित केला आहे. शासनाने लक्ष घालून लवकरात लवकर फुल दुरुस्त करावा अशी मागणी नागरिकांकडून व लोकप्रतिनिधी यांच्याकडूनही केली जात आहे. निवेदन देऊनही पुलाचे पुनर्बांधणी होत नाही. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी प्रशासनास इशारा दिला आहे की, लवकरात लवकर काम करावे अन्यथा पुलाव आंदोलन करण्यात येईल.

## कलाकार योगेश पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत समाज क्रांती पुरस्कार सोहळा



**अक्षराज : संग्राम ठाकूर**

**दि.०३, उरण (रायगड) :** बी.एस.एफ बहुद्देशीय संस्थेच्या वतीने अमरावती येथे ऑगस्ट २०२५ मध्ये समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले असून रायगड अलिबाग येथील प्रसिद्ध हास्य विनोदी कलाकार व अभिनेता योगेश भिकाजी पवार उपस्थित राहणार असून विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केलेल्या ५० मान्यवरांना समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. अभिनेता योगेश भिकाजी पवार हे नावं सम्पूर्ण महाराष्ट्राला परिचित असून संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचे शो सुरु असतात. त्यांनी झी मराठी तुला पाहते रे, स्टार प्रवाह वरील दुहेरी या मराठी मालिका मध्ये तसेचं दगडी चाळ २ मराठी चित्रपट,प्यारी दुल्हन हिंदी चित्रपट तसेचं अनेक शॉर्ट फिल्म, युट्युब फिल्म, टीव्ही जाहिराती इत्यादी विविध ठिकाणी महत्वाची भूमिका निभावली असून पुरस्कार सोहळ्यास ते अमरावती येथे उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती समाज क्रांती पुरस्कार सोहळ्याचे मुख्य आयोजक व बी एस एफ संस्थेचे अध्यक्ष भूषण सरदार यांनी दिली, या कार्यक्रमात अनेक रील स्टार, प्रसिद्ध कलाकार आणि प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित असणार आहेत.

# चिमुकल्या मुलांची पोटासाठी मासेमारी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, वाई (सातारा) :** जून महिन्यात नवीन वर्षातील शाळा सुरू झाली लहान मुला मुलींची हातात पाट्या पेन्सिल घेऊन अ-आ-इ, १-२-३ गिरवण्यास सुरुवात झाली. मात्र वाईतील कातकरी समाजातील चिमुकली मुलं हातात फाटक्या लुगड्याचा धडपा घेऊन कृष्णा नदीच्या पाण्यात उतरून पोटापाण्यासाठी मासेमारी करून आई-वडिलांना मदत करण्याची वेळ आली आहे. कातकरी समाजाचा मासेमारी खेकडे पकडणे पारंपारिक व्यवसाय आहे. हे लोक नदी ओढा डोहामध्ये खोल पाण्यात उतरून दिवसभर शोधाशोध करून मासेमारी करतात. दुपारनंतर शहरातील बाजारपेठेत किंवा गावोगावी फिरून मासे विक्री करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतात लहान मुले आई-वडिलांच्या मागे नदीवर फिरतात अशातच मासे धरले सुरू होते. मासे धरून कुटुंबाला हातभार लावण्याचा त्यांचा निश्चितच प्रयत्न असतो.

शाळा शिक्षण हे काहींच्या वाट्याला कमीच शासनाने आदिवासी कातकरी समाजाला शिक्षण व स्थानिक निवारा देण्याच्या योजना राबवले आहेत. पण पोटापाण्यासाठी या समाजाची भटकंती सुरूच आहे. मासे विकून कुटुंब चालवणे हे त्यांचे नेत्याचेच ठरले आहे. अशा मुला मुलींना शिक्षणाची गोडी आवड निर्माण करण्यासाठी प्रबोधनाची गरज वाटते. अशा वंचित मुलांना साक्षर करणे ही पालकांची जबाबदारी आहे. मासेमारी पारंपारिक व्यवसाय असला तरी मुलांना शिक्षणाकडे लक्ष केंद्रित करणे ही सुद्धा काळाची गरज आहे. अशा उपेक्षित समाजाच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देणे सर्वांचे कर्तव्य आहे.

## सगरोळी सोसायटीच्या चेअरमन पदी सरस्वतीबाई गौड यांची एकमताने निवड



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०२, बिलोली (नांदेड) :** तालुक्यातील मौजे सगरोळी येथील सरस्वतीबाई गोविंदगौड मोतीवार यांची एकमताने निवड करण्यात आली. तालुक्यात सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या सगरोळी येथील सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमन पदी सरस्वतीबाई गोविंदगौड मोतीवार यांची निवड करण्यात आली आहे. बिलोली तालुक्यातील सगरोळी येथील सेवा सहकारी सोसायटीची दिनांक ०२ जुलै २०२५ रोजी चेअरमन निवडीसाठी प्रक्रिया पार पडली. यावेळी चेअरमन पदासाठी ज्येष्ठ संचालक सरस्वतीबाई गोविंदगौड मोतीवार यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली यावेळी संचालक रोहित प्रमोद देशमुख, शिवा पाटील बाबणे,विश्वनाथ पाटील समन,हणमंत अप्पा मठवाले, शंकर पा. महाजन, शंकर अप्पा उदगीरे,दत्ता पाटील कोटनोड, संजय याबनोड, श्रीनिवास दमय्यावार, सरपंच प्रतिनिधी तथा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे इनामदार यांची उपस्थिती होती. यावेळी प्राधिकृत अधिकारी म्हणून ए जी पद्मावार यांनी काम पहिले भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष सतीश गौड मोतीवार यांच्या मित्रपरिवारानी निवडीबद्दल अभिनंदन केले. यावेळी सगरोळी येथील ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक मित्र परिवाराची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# आरटीई विद्यार्थ्यांना अजूनही पुस्तके नाहीत; मनसेची शाळा प्रशासनाकडे चौकशी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०३, दिवा (ठाणे) :** दिवा परिसरातील एस.एम.जी. इंग्रजी माध्यम शाळेत RTE (शैक्षणिक हक्क कायदा) अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अजूनही शालेय पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आलेले नाही. या मुद्यावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी शाळेच्या प्राचार्यांची भेट घेऊन पुस्तकांची मागणी केली. या भेटीदरम्यान शाळेच्या प्राचार्यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की, इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या ठढए विद्यार्थ्यांना मोफत गणवेश आणि पुस्तके द्यावीत, अशा स्वरूपाचे कोणतेही आदेश किंवा मार्गदर्शक सूचना शिक्षण विभागाकडून आम्हाला मिळाल्या नाहीत. तसेच, विद्यार्थ्यांचा प्रवेश घेताना पालकांकडून पुस्तके व गणवेश शाळेकडून मागणार नाही अशी लेखी संमती घेण्यात आली होती, असेही प्राचार्यांनी स्पष्ट केले. तथापि, या संदर्भात पालकांनी कोणतीही लेखी संमती दिल्याचे नाकारले असून, अशाप्रकारे पालकांना अंधारात ठेवून संमती घेतली गेली का? असा गंभीर प्रश्न मनसे पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला. या मुद्यावर मनसे पदाधिकाऱ्यांनी शिक्षण विभागाशी संपर्क साधला असता, त्यांनी पुढील दोन दिवसांत या विषयावर स्पष्टता आणणारे परिपत्रक दिव्यातील सर्व शाळांना पाठवले जाईल, असे आश्वासन दिले आहे. शालेय शिक्षणातील अशा अनियमिततेमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान टळावे आणि आरटीई अंतर्गत येणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्काची शैक्षणिक साधने वेळेवर मिळावीत,यासाठी पालकांनी संबंधित शिक्षण विभागाशी तत्काळ कारवाईची मागणी केली आहे. यावेळी दिवा शहर सचिव प्रशांत गावडे, विभाग अध्यक्ष प्रकाश पाटील, उप विभाग अध्यक्ष शैलेंद्र कदम, उपविभाग अध्यक्ष सुशांत तांडेल, शाखाध्यक्ष निकिता सालप, नम्रता खराडे, धनेश पाटील, गणेश आवटे, संकेत चव्हाण, गटाध्यक्ष लता कोंडविलकर, शिल्पा पार्ट, आरती सोनावणे इतर मनसे पदाधिकारी आणि पालकवर्ग उपस्थित होता.

